# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः12.09.2025** **वारःशुक्रवार**

---

1. नवनिर्वाचित उपराष्ट्रपति सी. पी. राधाकृष्णन यांचा आज शपथविधी, महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा तात्पुरता कार्यभार आचार्य देवव्रत यांच्याकडे
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत ज्ञान भारतम् विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी होणार
3. जीएसटीतल्या दरकपातीनंतर विक्रेत्यांना नवीन दरांची माहिती दुकानात लावण्याच्या केंद्राच्या सूचना आणि
4. भारतीय सैन्यातील महिला अधिकाऱ्यांच्या महत्त्वाकांक्षी जलपरिक्रमेला मुंबईतून प्रारंभ

**प्रभारी-राज्यपाल**

राष्ट्रपति द्रौपदी मुरमू आज राष्ट्रपती भवनात नवनिर्वाचित उपराष्ट्रपति सी. पी. राधाकृष्णन यांना पद आणि गोपनीयतेची शपथ देतील. राधाकृष्णन हे 15 वे उपराष्ट्रपती होणार आहेत. या महिन्याच्या 9 तारखेला झालेल्या उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत एनडीएचे उमेदवार राधाकृष्णन यांनी 452 मतं मिळवून इंडी आघाडीचे उमेदवार आणि सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश बी. सुदर्शन रेड्डी यांचा 152 मतांनी पराभव केला. दरम्यान सी. पी. राधाकृष्णन यांनी काल महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा राजीनामा दिला. गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याकडे महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे.

**ज्ञानभारतम्-मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज संध्याकाळी नवी दिल्लीत ज्ञान भारतम् विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी होणार आहेत. यावेळी ते ज्ञान भारतम् पोर्टलचं उद्घाटन करतील आणि उपस्थितांना संबोधित करतील. हस्तलिखितांचे डिजिटायझेशन, जतन आणि सार्वजनिक सहभागाला गती देण्यासाठी ज्ञान भारतम् ह्या डिजिटल पोर्टलची निर्मिती करण्यात आली आहे. 'हस्तलिखित वारशाच्या माध्यमातून भारताच्या ज्ञानाचा वारसा पुन्हा मिळवणे' ही या परिषदेची संकल्पना असून कालपासून ह्या परिषदेची सुरुवात झाली आहे. देशोदेशीचे विद्वान, संवर्धनवादी, तंत्रज्ञ आणि धोरण तज्ज्ञ या परिषदेत सहभागी झाले आहेत.

**पंतप्रधान-मॉरिशस चर्चा**

पंतप्रधानांनी काल वाराणसी इथं मॉरिशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. भारत आणि मॉरिशस ही दोन भिन्न राष्ट्रे असली तरी आमची स्वप्न एक आहेत असं मोदी यांनी एका संयुक्त पत्रकार परिषदेत सांगितलं. यावेळी विज्ञान आणि तंत्रज्ञान, समुद्रशास्त्र, प्रशासकीय प्रशिक्षण आणि टेलिमेट्री या क्षेत्रांमध्ये चार सामंजस्य करारांच आदानप्रदान झालं. तसंच वीज क्षेत्र आणि लघु विकास प्रकल्पांसाठी भारताकडून अनुदान सहाय्य आणि जलविज्ञान यासारख्या विषयांवरील दस्तऐवजांची देवाणघेवाण झाली. मॉरिशसचे पंतप्रधान 9 ते 16 सप्टेंबर 2025 दरम्यान एका आठवड्याच्या भारत दौऱ्यावर आहेत.

**उत्तराखंड-पंतप्रधान**

उत्तराखंडमधील ढगफुटी, पाऊस आणि भूस्खलनामुळे निर्माण झालेली पूर परिस्थिती आणि नुकसान यांचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल आढावा घेतला. पंतप्रधानांनी उत्तराखंडसाठी 12 शे कोटी रुपयांच्या आर्थिक मदतीची घोषणा केली. या आपत्तीमुळे अनाथ झालेल्या मुलांना, त्यांच्या दीर्घकालीन कल्याणासाठी पीएम केअर्स फॉर चिल्ड्रन योजनेद्वारे मदत करण्यात येईल असंही पंतप्रधानांनी जाहीर केलं.

**डेंग्यू- नड्डा-आढावा**

केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी काल देशातल्या डेंग्यू आणि हिवताप संसर्गाच्या परिस्थितीचा आढावा घेतला. महाराष्ट्र आणि दिल्ली-एनसीआरसह अनेक राज्यांत झालेल्या पावसामुळे डेंग्यू आणि हिवतापाच्या रुग्णसंख्येत वाढ झाल्याच्या

अहवालांच्या पार्श्वभूमीवर ही बैठक झाली. सर्व राज्यांच्या आरोग्यमंत्र्यांनी जातीनं परिस्थितीचा आढावा घेऊन 20 दिवसांच्या आत कृती आराखडा तयार करावा अश्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

**गुंतवणूक-मुख्यमंत्री**

'महाराष्ट्र हे देशातील एक उद्योगस्नेही राज्य असून उद्योग आणि गुंतवणुकीसाठी सर्वोत्तम आहे. नुकतेच राज्यात एक लाख नऊ हजार कोटींचे उद्योजकता गुंतवणूक करार करण्यात आले असून त्यातून 47 हजार तरुणांना रोजगार मिळणार आहेत', अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत दिली. इंडिया-ऑस्ट्रेलिया बिझनेस अँड कम्युनिटी अलायन्स ग्लोबल फोरम लिडर्स मीट आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह झालेल्या गोलमेज परिषदेनंतर ते बोलत होते.

**आयएनएसव्ही त्रिवेणी**

लष्कर, नौदल आणि हवाई दलातल्या महिला अधिकाऱ्यांच्या समुद्र प्रदक्षिणेला काल मुंबईच्या ऐतिहासिक गेट वे ऑफ इंडिया इथून सुरुवात झाली. संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी दूरस्थ पद्धतीनं IASV त्रिवेणी या शिडाच्या नौकेवरच्या मोहिमेला रवाना केलं. सैन्यदलप्रमुख जनरल अनिल चौहान, तसंच देशाच्या तिन्ही सशस्त्र दलांचे प्रमुख यावेळी उपस्थित होते. याविषयी अधिक जाणून घेऊ या आमच्या प्रतिनिधीकडून...

**देशाच्या तिन्ही सशस्त्र दलांच्या महिला अधिकाऱ्यांच्या चमूनं समुद्री जगप्रदक्षिणेला जाण्याची ही पहिलीच वेळ आहे. या चमूत लष्कराच्या पाच, नौदलाच्या एक आणि हवाई दलाच्या चार अधिकाऱ्यांचा समावेश आहे. नऊ महिन्यांच्या या प्रदीर्घ प्रवासादरम्यान हा चमू दोनवेळा विषुववृत्त पार करेल, तसंच केप लूइन, केप हॉर्न आणि केप ऑफ गुड होप या तिन्ही ग्रेट केप्सना वळसा घालेल. या मोहिमेचं नेतृत्व लेफ्टनंट कर्नल अनुजा वरुडकर यांच्याकडे आहे. या मोहिमेतल्या टप्प्यांविषयी अधिक माहिती देताना त्या म्हणाल्या...**

**ही पूर्ण प्लॅनिंग जी आहे ती आम्ही भागांमध्ये तोडलेली आहे, कारण एकवीस हजार सहा शे नॉटिकल माईल खूप मोठा टप्पा आहे, म्हणजे ऑस्ट्रेलिया ते न्यूझीलंड न्यूझीलंड ते अर्जेन्टिना अर्जेन्टिना ते केप टाऊन आणि केप टाऊन ते मुंबई. प्रत्येक लेगला किती दिवस लागतील कुठले कुठले वेदर पॅटर्न्स आहेत करंटस कुठे लागतील कसं तुम्ही खायचं प्यायचं बघणार आहात तुमच्या वेदरमध्ये जर का कुठलं तूफान आलं किंवा कुठलं वादळ आलं तर त्या वादळामध्ये तुम्ही कसं बिहेव करणार आहात काय काय वट हे रिपे तुम्ही अँटीसिपेट करता तर त्या सगळ्या गोष्टी ज्या आहेत त्या विचार करून आम्ही याच्यामध्ये प्लॅनिंग केलेलं आहे.**

**26 हजार 100 नॉटिकल मैलांपेक्षा जास्त प्रवास करून पुढच्या वर्षी मे महिन्यात मुंबईत परतण्याचं त्यांचं नियोजन आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी, मुंबईहून अंकिता आपटे.**

**अरवली**

भारताच्या सागरी सुरक्षेला चालना देण्यासाठी एक महत्त्वाचं पाऊल म्हणून, भारतीय नौदल आज गुरुग्राम इथं आयएनएस अरवली तैनात करणार आहे. अरवली पर्वतरांगांच्या नावावरून हे नाव ठेवण्यात आलं आहे. आयएनएस अरवली हे जहाज नौदलाच्या माहिती आणि दळणवळण क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या माजबूतीसाठी तयार करण्यात आलं असून देशाच्या सागरी हिताचं संरक्षण करण्यासाठी महत्वाचं ठरेल असं संरक्षण मंत्रालयानं एका निवेदनात म्हटलं आहे.

**जीएसटी**

जीएसटीतल्या दरकपातीनंतर कमी होणाऱ्या दरांची माहिती दुकानात लावण्याच्या सूचना केंद्र सरकारनं विक्रेत्यांना केल्या आहेत. घाऊक तसंच किरकोळ विक्रेते दोघांनाही हे फलक लावावे लागणार आहेत. तसंच जीएसटीच्या संकेतस्थळावरही ही यादी प्रदर्शित करावी लागणार आहे. विविध उद्योग संघटनांच्या बैठकीत केंद्रीय अप्रत्यक्ष कर मंडळानं या सूचना केल्या. दरम्यान जीएसटी प्रणालीतील या सुधारणेचं स्वागत व्यापारी, सामान्य नागरिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर करत आहे. पालघरमधील औषध विक्रेते मनोज मिस्त्री यांची ही प्रतिक्रिया..

**मी मेडिकल औषधाच्या रिलेटिवमध्ये काम करतोय तर जे गव्हर्नमेंटनी जी एस टीचं जे कमी केलेलं आहे मेडिसिनवरती चौतीस मेडिसिनवरती कमी केलेलं आहे त्याच्यामुळे सर्वसामान्यांचा फायदा होणार आहे आणि मेडिकलवाल्यांचा पण फायदा होणार आहे डायबिटीज आहे बी पी आहे नंतर कॉलेस्ट्रॉल आहे हार्टच्या रिलेटेड आहे बाकी इतर मेडिसिन आहे त्याच्यामुळे खूप लोकांना राहत भेटलेली आहे.**

**नेपाळ**

नेपाळचे राष्ट्रपती रामचंद्र पौडेल आणि सभापती देवराज घिमिरे यांनी काल एक बैठक घेतली. यात नेपाळमधील सध्याच्या घडामोडींवर चर्चा झाली, अशी माहिती सभापतींचे माध्यम तज्ञ शेखर अधिकारी यांनी दिली. संविधानाच्या कक्षेत राहून राजकीय तोडगा काढला जाईल असं पौडेल यांनी म्हटलं आहे. 8 सप्टेंबरनंतर निर्माण झालेल्या परिस्थितीनंतर राष्ट्रपती आणि सभापती यांच्यात झालेली ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे.

**माओवादी ठार**

छत्तीसगढ मध्ये काल सुरक्षा दलं आणि माओवाद्यांच्या झालेल्या चकमकीत 10 माओवादी ठार झाले. ठार झालेल्यांमध्ये मनोज उर्फ भास्कर या माओवादी संघटनेच्या म्होरक्याचा समावेश आहे. त्याच्यावर एक कोटी रुपयांचं पारितोषिक लावण्यात आलं होतं. गरीयाबंद जिल्ह्यातील मणिपूर इथल्या भालूडिग्गी जंगलात मोठ्या संख्येने माओवादी जमा झाल्याची माहिती मिळाल्यानंतर, विशेष कृती दल आणि कोब्रा बटालियनने ही कारवाई केली.

**क्रिकेट-आशिया चषक**

वीस षटकांच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत काल अबुधाबी इथे खेळल्या गेलेल्या 'ब' गटातील सामन्यात बांगलादेश संघानं हाँगकाँग संघावर 14 चेंडू सात गडी राखून मात केली. हाँगकाँग संघाने प्रथम फलंदाजी करत

बांग्लादेश संघासमोर 144 धावांचं आव्हान ठेवलं होतं. बांग्लादेशच्या लिट्टोन दासने 59 चेंडूत 39 धावा फाटकावल्या. त्यालाच सामनावीर घोषित करण्यात आलं.

**<u>अंध महिला</u>**

भारतात होणाऱ्या अंध महिलांच्या वीस षटकांच्या पहिल्या वहिल्या विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय चमूची घोषणा करण्यात आली आहे. खेळाडूंची तीन श्रेणीत विभागणी करण्यात आली आहे. दीपिका टी. सी. कडे संघाची धुरा सोपवण्यात आली असून गंगा एस. कदम उप-कप्तान असेल.

**<u>हवामान</u>**

येत्या 24 तासात महाराष्ट्रातील मराठवाडा, नागालँड, मणिपूर, मिझोरम आणि त्रिपुरा इथं मुसळधार ते अतिमुसळधार तर  मध्य महाराष्ट्र, कर्नाटकचा काही भाग, आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, बिहार आणि छत्तीसगड इथं मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागांना व्यक्त केला आहे. देशातील इतर अनेक राज्यातही काहीशी अशीच परिस्थिती आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.